# मराठीला जिवंत ठेवा !

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मुद्दे '*' या चिन्हाने दर्शवले आहेत.)


१. मराठीच्या दुरवस्थेचे परिणाम ११

* मराठी असे अमुची राजभाषा । जरी आज ती मायबोली नसे ।। ११
* पंचवीस वर्षांनंतर मुंबईत मराठी भाषिकांची संख्या शून्यावर येण्याची भीती ! १२
* गावोगावी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्याने शाळेत विद्यार्थीच न येणे ! १२
* इंग्रजीत अनुत्तीर्ण झाल्याने महाविद्यालयीन शिक्षणाची दारे बंद होणे ! १२
* इंग्रजीच्या अतिरेकी प्रेमामुळे समाजाची विभागणी होणे १६
* इंग्रजीचा आग्रह हा राष्ट्रीय वृत्तीच्या अभावाचे लक्षण ! १७
* भाषाभिमानशून्य देश रसातळाला जातो ! १८
* इंग्रजी भाषेमुळे इंग्रजी संस्कृतीशी एकरूप होणे १९
* इंग्रजी भाषेमुळे होणारी सांस्कृतिक हानी २०
* विद्यार्थ्यांना कुसंस्कारी बनवणारे इंग्रजी माध्यमातील शिक्षण २१
* हिंदु धर्मातील आध्यात्मिक परंपराच संपुष्टात येऊ लागणे २३
* मायबोलीचा ऱ्हास करणाऱ्यांना महाभयंकर पातक लागणे २४

२. आपल्याला इंग्रजी किती आवश्यक आहे ? २४

* आपल्याला इंग्रजी पहिलीपासून शिकणे आवश्यक आहे का ? २५
* इंग्रजी शिकण्यात शक्ती व्यय झाल्याने वैचारिक प्रगल्भता कमी होणे २६

३. मराठीचा अभिमान असणाऱ्या काही कृतीशील व्यक्ती २६

* बाळासाहेब ठाकरे यांचा 'मऱ्हाटी' हिसका २८
* मराठी भाषेसाठी कार्यरत असलेले मनसेप्रमुख श्री. राज ठाकरे ! २८

४. मराठी भाषा जिवंत ठेवायची असेल, तर हे केलेच पाहिजे ! २९

* मराठी भाषेच्या प्रसारासाठी भाषिक चळवळ उभारणे आवश्यक ३१
* ईश्वरापासून दूर नेणाऱ्या इंग्रजी भाषेपासून दूर रहा ! ३२
* ज्यूंप्रमाणे प्रखर भाषाभिमान हवा ! ३३
* मराठीच शब्द वापरण्याचा निश्चय ३४

* इंग्रजी भाषेविना काहीही अडत नाही, हे दाखवता आले पाहिजे ३४
* इंग्रजीच्या आहारी न जाताही भौतिक व सांस्कृतिक प्रगती साध्य
करणारी राष्ट्रे आहेत, हे लक्षात ठेवा ! ३५
* हिंदूंनो, आपल्या मुलांना आपली मातृभाषा शिकवा ! ३७
* इंग्रजी भाषेच्या शिक्षणामुळे होणारी हानी कळलेले द्रष्टे लोकमान्य टिळक ! ३९
* इंग्रजीचा एवढा पुळका का ? ४०
* मातृभाषेतून शिक्षण घेण्याचे महत्त्व ४०
मराठी भाषिक पालकांनो, मुलांना मराठी माध्यमाच्या शाळेत घाला ! ४१
* 'मराठीतील 'ऱ्हस्व-दीर्घ' अवघड आहेत', असे म्हणणाऱ्यांनी
इंग्रजीचे 'स्पेलिंग' जास्त अवघड आहे, हे लक्षात घ्यावे ! ४२
* मराठी भाषेची थोरवी जाणून परकीय शब्द बहिष्कृत करा ! ४४
* नावात इंग्रजी अक्षरांनी आद्याक्षरे न लिहिता,
मराठी (मातृभाषेतील) आद्याक्षरे वापरा ! ४४
* दारावर पाटी मराठीत लावा रे । स्वाक्षरी मराठीत करा रे ।। ४४
* संभाषण, नोंदी व लेखन यांसाठी मराठीचा वापर करा ! ४४
* दिनांक लिहितांना मराठी कालगणनेचा वापर करा ! ४९
* मातृभाषेची गळचेपी रोखण्यासाठी समाजाने काय करायला हवे ? ५१
* राष्ट्राभिमान निर्माण करण्यासाठी प्रथम स्वभाषाभिमान निर्माण
होणे महत्त्वाचे असणे ५१

# मनोगत

'राष्ट्रास परक्या भाषेतून शिक्षण देणे, म्हणजे त्याला नपुंसक करण्यासारखे आहे. इंग्रजी भाषा शिकण्यापायी वर्षेच्या वर्षे फुकट जातात आणि धर्मासंबंधाचे ज्ञान 'शून्य' मिळते', असे शिक्षण क्षेत्रातील इंग्रजीच्या घुसखोरीविषयी परखड विचार लोकमान्य टिळकांनी १९०८ मध्ये व्यक्त केले होते. आता १०० वर्षांनंतर परिस्थिती फारच भीषण झाली आहे. महाराष्ट्रात शिक्षणक्षेत्रच नव्हे, तर वैद्यकीय क्षेत्र, न्यायपालिका, प्रशासन आदी सर्वच क्षेत्रांत मराठीला एका कोपऱ्यात ढकलून इंग्रजीने वर्चस्व प्राप्त केले आहे. धार्मिक क्षेत्रातसुद्धा इंग्रजीने शिरकाव केला आहे. कित्येक सुशिक्षितही आता त्यांच्या विवाहाची निमंत्रण पत्रिका इंग्रजीत छापून घेतात. इंग्रजीसह परकीय भाषांच्या या आक्रमणाला वेळीच प्रतिबंध केला नाही, तर पुढे पूजा आणि धार्मिक विधीसुद्धा इंग्रजीत व्हायला लागतील.

प्राचीन काळी असुरांनी अनेकदा वेद पळवले व पाताळात नेऊन दडवले. तरीही भगवंताने प्रत्येक वेळी ते वर आणून त्यांचे रक्षण केले, म्हणून ते आज मूळ स्वरूपात आपल्यापर्यंत पोहोचले आहेत. असुरांसारखेच कार्य स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्वांत जास्त काळ सत्तेवर असणारी काँग्रेसची राजवट करत आहे. तिने देवभाषा संस्कृतला नष्ट करण्याचा प्रयत्न करून हिंदु संस्कृतीवर प्रथम घाव घातला. संस्कृतच्या खालोखाल सात्त्विक असणाऱ्या मराठी भाषेचीही गळचेपी इंग्रजी शिक्षण घ्यायला लावून काँग्रेसचे शासन करत आहे.

मराठीच्या दुरवस्थेचे परिणाम कथन करून मराठीला पूर्वीचे वैभव प्राप्त करून देणे, हे या ग्रंथाचे प्रयोजन आहे. यासाठी स्वाक्षरी मराठीतून करणे,आपल्या मुलांना 'मम्मी-डॅडी' म्हणायला न लावता 'आई-बाबा' म्हणायला शिकवणे, त्यांना 'हॅरी पॉटर' वाचायला न देता 'पंचतंत्रा'तील कथा वाचायला देणे, यांसारख्या अनेक लहान-मोठ्या कृती मराठी माणसाला करता येतील. मराठी भाषेला वाचवण्याचे अन्य उपायही या ग्रंथात दिले आहेत.

हा ग्रंथ वाचून जास्तीतजास्त जणांना मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी व तिचे चैतन्य टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यास स्फूर्ती मिळो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक**